३१|५

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

दूरध्वनी क्र २२८२९३६८
Email ID : comp.fd@maharashtra.gov.in

वित्त विभाग, मंत्रालय (विस्तार), दालन क्र.३३३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

क्र.सीओएम-२०२१/प्र.क्र.२५/संगणक कक्ष, दिनांक : २४ डिसेंबर, २०२१

प्रति,

१. अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान), सा.प्र.वि., मंत्रालय, मुंबई.
३. उप सचिव (उद्योग-४), उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, मुंबई.

विषय - प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या ६२ व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

वित्त विभाग व वित्त विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयांकरिता संगणकीकरण विषयक प्रस्तावांवर निर्णय घेण्याकरिता प्रकल्प अंमलबजावणी समिती ( PIC ) गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीची ६२वी बैठक दि.२०.१२.२०२१ रोजी दुपारी १२.३० वाजता प्रधान सचिव (वि.सु.) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

२. सदर बैठकीचे इतिवृत्त माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सोबत जोडले आहे.

आपला,

(स्वाक्षरी)

( वि. अ. धोत्रे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र:- वरीलप्रमाणे

प्रत :-
1) निवडनस्ती (संगणक कक्ष)
2) प्र.क्र.१४/२०२१/सं.क.

O/C
वसंपरव
२४/१२/२१

**विषय – प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) ६२व्या बैठकीचे इतिवृत्त.**

वित्त विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची ६२ वी बैठक प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि.२०.१२.२०२१ रोजी दुपारी १२.३० वाजता त्यांच्या दालनात, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे पार पडली.

प्रस्तुत बैठकीस समितीचे पुढील सदस्य आणि अन्य संबंधित पदाधिकारी हजर होते :-

१. श्री.राजगोपाल देवरा, प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, तथा अध्यक्ष, प्रकल्प अंमलबजावणी समिती,
२. श्री.वि.रं.दहिफळे, सह सचिव (व्यय), वित्त विभाग,
३. श्री.वि.अ.धोत्रे, उप सचिव (संगणक कक्ष), वित्त विभाग, मंत्रालय,
४. श्री.सु.मु.ऐगळीकर, उप सचिव (आस्थापना), वित्त विभाग,
५. श्री.संजय भांडारकर, उप सचिव, नियोजन विभा
६. श्रीमती माधवी गांधी, अवर सचिव (संगणक कक्ष), वित्त विभाग, मंत्रालय,
७. श्री.रफिक मोहम्मद, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, मुंबई,
८. श्री.अमोल बने, उद्योग विभाग

::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::

बैठकीत खालील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यात आले :-

**विषय क्र.१ :- वित्त विभाग (खुद्द) करिता अंदाजित रु.६७,००,०००/- किंमतीचे संगणक, प्रिंटर्स व लॅपटॉप खरेदी करणेबाबत :-**

वित्त विभागाकरिता संगणक, प्रिंटर्स व लॅपटॉप खरेदीबाबतची आवश्यकता उप सचिव (संगणक कक्ष) यांनी समितीच्या निदर्शनास आणली. विभागात सद्य:स्थितीत २५१ अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत. सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांना स्वतंत्र संगणक पुरविणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक कार्यासनास, उप /सह सचिव यांना, सचिव यांना व सचिवांचे स्वीय सहायक यांना प्रत्येकी १ प्रिंटर, तसेच उप / सह सचिव यांना लॅपटॉप पुरविणे आवश्यक आहे. विभागात अनेक संगणक, प्रिंटर्स नादुरुस्त झाले असून वॉरंटी संपलेली असल्यामुळे दुरुस्तीसाठी खर्च करणे व्यवहार्य होत नाही. संगणक कक्षाकडे सद्य:स्थितीत संगणक, प्रिंटर्स उपलब्ध नसल्याने नवीन खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकरिता खालीलप्रमाणे सामुग्री खरेदी करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव समितीसमोर सादर करण्यात आला:-

| अ. क्र. | तपशील | संख्या | किंमत प्रति नग (अंदाजित वाढीसह) | एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | संगणक | १०० | ५९,०००/- | ५९,००,००० |
| २ | प्रिंटर | ४० | १६,५००/- | ६,६०,०००/- |
| ३ | लॅपटॉप | २ | ६९,५००/- | १,३९,०००/- |
| | एकूण | | | ६६,९९,०००/- |

तथापि, चर्चेमध्ये असे निदर्शनास आले की, विभागातील ४ उप / सह सचिव यांना लॅपटॉप उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. अपर मुख्य सचिव (ले.व को.) यांच्या कार्यालयाकडून मल्टिफंक्शनल कलर प्रिंटरची मागणी करण्यात आलेली आहे. तसेच विभागातील जुन्या संगणक सामग्रीचे निर्लेखन करणे आवश्यक आहे.

**समितीचा निर्णय :-**

(१) खरेदी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत किंमतीतील संभाव्य बदल विचारात घेऊन, समितीने खालीलप्रमाणे संगणक सामुग्री उपलब्ध निधीच्या मर्यादेत, विहित कार्यपद्धती अनुसरुन, Gem Portal द्वारे खरेदी करण्यास मान्यता दिली :-

| अ. क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | संगणक | ५० |
| २ | प्रिंटर | २५ |
| ३ | लॅपटॉप | ४ |
| ४ | मल्टिफंक्शनल कलर प्रिंटर | १ |

(३) माहिती तंत्रज्ञान विभागान दिलेल्या specification मध्ये किंचत बदल करुन, संगणकासोबत माऊस व कीबोर्ड वायरलेस पद्धतीचे (ब्ल्यूटूथ वर आधारित) घ्यावेत, तसे specification निविदेमध्ये नमूद करावे.

(२) जुनी संगणक सामुग्री निर्लेखनाचे काम तातडीने करण्यात यावे.

शेवटी उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

( राजगोपाल देवरा )
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), तथा
अध्यक्ष, प्रकल्प अंमलबजावणी समिती, वित्त विभाग.